MRSDMM

**MAHARSHTRA RAJYA SAHAKARI DUDH MAHASANGH MARYADIT, MUMBAI**
**MAHANAND DAIRY**
**Unit No.12,Aarey Colony,Western Express Highway, Goregaon (E),Mumbai 400 065**
**Tel. : 2685 6360/61, 2685 6585 Fax 2685 6780**

# ENQUIRY

Ref.No.MS/06/Estate/Water Tanker/2022-23/ Date: 11.08.2022

To,
M/s, ______________________
______________________
______________________
______________________

Dear Sir,
Kindly submit your lowest offer for the following items mentioned below. Quotations may please be sent to us on or **before Dt.24.08.2022** Quotation received after the due date mentioned here in will not be considered. Quotation should be sent in sealed cover duly marked as Quotation for " **Water Transport Contract For Transportation of Drinking water From Mahanand Dairy to Mahanand Niwas Check Naka** "

**Scope of work :-**

| Sr. No. | Description | Qty. | Offer Price (Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | Water Transport Contract For Transportation of Drinking water From Mahanand Dairy to Mahanand Niwas Check Naka, Goregaon (E.) for the contract period of 1st Oct. 2022 To 30th Sept., 2023 as per terms & conditions attached herewith in Annexure | 10,000 Ltr. Capacity of Tanker | |
| | | 20,000 Ltr. Capacity of Tanker | |

1) Terms of Payment as mentioned in Annexure .
2) Taxes should be mentioned separately.

. Your's Faithfully

(Hemant A. Sardeshmukh)
Dy. Manager ( Estate)

| **OPENING DATE : 25.08.2022** |
|---|
| **Please mention above enquiry And opening date on the cover.** |

MRSDMM

**MAHARSHTRA RAJYA SAHAKARI DUDH MAHASANGH MARYADIT, MUMBAI**
**MAHANAND DAIRY**
**Unit No.12,Aarey Colony,Western Express Highway, Goregaon (E),Mumbai 400 065**
**Tel. : 2685 6360/61, 2685 6585 Fax 2685 6780**

## ENQUIRY

---

## Annexure (सर्वसाधारण अटी-शर्ती)

१) रिकाम्या टँकरची पाणी साठविण्याची/वाहतूक करण्याची क्षमता १०,०००/२०,००० लि. धरुन त्याप्रमाणे दर सादर करावेत. टँकरची क्षमता वजन काटयावर तपासून त्याप्रमाणात देयकाची अदायगी करण्यात येईल. दररोज किमान ४०,००० लि. पाणी वाहतूक करणे गरजेचे आहे. तसेच आवश्यकते नुसार कमी/जास्त पाणी वाहतूक केली जाईल.

२) सुरक्षा अनामत ठेव :- यशस्वी ठेकेदारास सुरक्षा अनामत रक्कम रु.२५,०००/- बिनव्याजी दूध महासंघाकडे ठेक्याच्या कालावधीत ठेवावी लागेल. यशस्वी ठेकेदाराने सदर बिनव्याजी सुरक्षा अनामत रक्कम महासंघाचा कार्यादेश मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत जमा करावी. ठेक्याचा कालावधी संपल्यानंतर (करारातील पूर्ण कालावधी अथवा ठेका दूध महासंघाने खंडीत केल्यास) त्यानंतर सर्व हिशोब पूर्ण झाल्यानंतर ठेकेदारांकडून दूध महासंघास जर काही रक्कम येणे असेल तर ती वजा करुन ठेकेदाराला परत केली जाईल.

३) रिकामा पाण्याचा टँकर चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. साधारण टँकर मॉडेल हे ५ वर्षे पेक्षा जुने नसावे. याबाबतची सर्व वैधानिक बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे.

४) पिण्याच्या पाण्याची वाहतूक महानंद दुग्धशाळेतून महानंद निवास, आरे चेक नाका, गोरेगांव (पूर्व) येथे दररोज आवश्यकतेप्रमाणे करावयाची आहे. फेऱ्या कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार दूध महासंघास राहील. यामध्ये खंड पडता कामा नये.

५) महानंद निवास पिण्याच्या पाण्याची वाहतूक करण्याकरिता रिकामा टँकर ठेकेदार दैनंदिन पुरविणार आहे त्या टँकर व्यतिरिक्त एक जादा टँकर ठेकेदाराकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

६) ठेक्याचा कालावधी संपल्यावर व त्यानंतर सर्व हिशेब पूर्ण झाल्यावर ठेकेदाराकडून जर काही रक्कम येणे असेल तर ती वजा करुन तीन महिन्यात बाकी रक्कम ठेकेदाराला परत केली जाईल.

७) ठेकेदाराने नियुक्त केलेला ड्रायव्हर, क्लीनर यांना दुखापत, अपघात, जीवितहानी झाल्यास होणाऱ्या सर्व परिणामांची व नुकसानीच्या भरपाईची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील.

८) ठेक्याच्या कालावधीमध्ये दूध महासंघास टँकरची आवश्यकता नसल्यास सदर ठेका दूध महासंघ एक महिन्याची आगाऊ नोटीस देऊन रद्द करु शकतो. परंतु ठेकेदारास ठेका कालावधीत ठेका रद्द करण्याचा अधिकार राहणार नाही. तसे केल्यास ठेक्या सोबत भरलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.२५,०००/- जप्त केली जाईल.

९) ठेकेदाराने स्वत: अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या ड्रायव्हर तसेच क्लिनर यांना महासंघाच्या सेवेत सामील होण्याचा अथवा महासंघाच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे इतर हक्क सांगण्याचा अधिकार राहणार नाही.

१०) सदर ठेक्याचा कालावधी दि.०१.१०.२०२२ ते दि.३०.०९.२०२३ पर्यंत असेल.

११) तसेच या ठेक्यातून निर्माण झालेली व ज्याला ठेकेदार जबाबदार आहे अशी आर्थिक जबाबदारी दूध महासंघास उचलावी लागली तर त्याकरिता खर्च केलेली रक्कम ठेकेदाराकडून वसूल करावयाचा अधिकार दूध महासंघास असेल. जर ठेकेदारासाठी महासंघास कोणास देणे द्यावे लागणार असतील तर ते वसूल करण्याचा हक्क दूध महासंघाचा राहील.

१२) महानंद निवासला पाणी वाहतूक करण्याकरिता उपलब्ध केलेल्या रिकाम्या टँकरमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यास पर्यायी टँकर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. ठेकेदाराने रिकामा टँकर उपलब्ध करुन दिला नाही तर तितक्या फेऱ्यांच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात येईल. अशावेळी कारणांचा खुलासा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१३) कोणत्याही दिवशी टँकरमध्ये भरण्यासाठी दुग्धशाळेत पाणी उपलब्ध नसल्यामुळे आवश्यक तितक्या फेऱ्या पूर्ण करणे शक्य न झाल्यास ठेकेदाराने तसे व्यवस्थापनाला अवगत करावे.

१४) प्रति फेरीसाठीची रक्कम एका वर्षासाठी निश्चित करण्यात येईल. त्या कालावधीत दरवाढ दिली जाणार नाही. परंतु कोणत्याही करामध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे बदल करण्यात येतील.

---

MAHARSHTRA RAJYA SAHAKARI DUDH MAHASANGH MARYADIT, MUMBAI
MAHANAND DAIRY
Unit No.12,Aarey Colony,Western Express Highway, Goregaon (E),Mumbai 400 065
Tel. : 2685 6360/61, 2685 6585 Fax 2685 6780

**ENQUIRY**

१५) ठेकेदाराने या करारातील कोणत्याही अटीचा भंग केल्यास एक महिन्याची पूर्व सुचना देऊन हा करार रद्द करण्यात येईल व त्यामुळे महासंघाचे जे आर्थिक नुकसान होईल ते सर्व सुरक्षा अनामत रक्कमेमधून आणि इतर कायदेशीर मार्गाने वसूल केले जाईल.

१६) जर ठेकेदाराचे कामगार महासंघा विरुध्द कोर्टात गेले तर कोर्टातील केसेसचा सर्व खर्च ठेकेदारास द्यावा लागेल व त्याकरिता महासंघास वरील रक्कम सुरक्षा अनामत (Security Deposit ) अथवा कंत्राटदारास देण्यात येणाऱ्या देय रकमेतून वजा करण्यात येतील.

१७) या ठेक्याचा करारनामा करुन होणारा मुद्रांकाचा व नोंदणीचा सर्व खर्च यशस्वी ठेकेदारास करावा लागेल.

१८) या करारा अंतर्गत ठेकेदारास वेळोवेळी देय होणाऱ्या रकमेतून सर्व आयकर व इतर कायदेशीर कपाती दूध महासंघ करुन घेईल.

१९) या व्यतिरिक्त दूध महासंघाच्या व्यवस्थापनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटी व शर्ती ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

२०) सदर ठेक्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता ठेकेदाराने स्वत: करावयाची आहे व याबाबत कोणतीही समस्या उद्‌भवल्यास त्यास महासंघ जबाबदार असणार नाही.

२१) कोणतीही अथवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा / रद्द करण्याचा अधिकार दूध महासंघ राखून ठेवीत आहे.

२२) या करारातून निर्माण होणारे सर्व वाद केवळ मुंबई येथील न्यायालयातच दाखल करता येतील.

वरील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

ठेकेदार

MAHARSHTRA RAJYA SAHAKARI DUDH MAHASANGH MARYADIT, MUMBAI
MAHANAND DAIRY
Unit No.12,Aarey Colony,Western Express Highway, Goregaon (E),Mumbai 400 065
Tel. : 2685 6360/61, 2685 6585 Fax 2685 6780

**ENQUIRY**

Ref.No.MS/06/Estate/Water Tanker/2022-23/ Date: 11.08.2022

| | |
|---|---|
| 1 | M/s. Purshottam Transports<br>164, L. B. Shastri Marg,<br>Kurla (W.),<br>Mumbai – 400 070. |
| 2 | M/s. Arjun Travels<br>170, L. B. Shastri Marg,<br>Kurla (W.),<br>Mumbai – 400 070. |
| 3 | M/s. Nilesh Enterprises<br>21, Ashok Super Market,<br>S. V. Road, Aarey Road Junction,<br>Goregaon (w.)<br>MumBAI – 400 062. |
| 4 | M/s. Sachin Enterprises<br>B/127, Ashok Super Market,<br>S. V. Road, Aarey Road Junction,<br>Goregaon (w.)<br>MumBAI – 400 062. |
| 5 | M/s. A. V. M. Transports<br>Bhavani Nagar, Aarey Colony,<br>Unit No. 13, Goregaon (E.),<br>Mumbai – 400 065. |
| 6 | M/s. Harjas Logistics & Infrastructure<br>Shree Swami Samarth Society,<br>Unit No. 7, Opp. Deep Apt.<br>Andheri (W.),<br>Mumbai – 400 053. |